# शांतीच्या शोधात...

**दैनंदिन कटकटी आणि गोंगाट असलेल्या वातावरणाने कंटाळलेल्या माणसांना मनाला शांतता हवी असते. या शांततेच्या शोधात तो कुठेतरी भटकत राहातो. मात्र, प्रत्येक ठिकाणी शांतता लाभेलच असे नाही. यावर उपाय म्हणजे विकेंडला कुठेतरी फिरायला जाणे. पुण्यापासून जवळच अशी काही ठिकाणे आहेत, तिथे नक्की मनःशांती लाभेल. त्या ठिकाणांविषयी...**




**दत्ता कोहिनकर**
kohinkarpatil@yahoo.co.in


'आला आला वारा, संगे पावसाच्या धारा... पावसाळा आला की ही धरतीच नव्हे; तर अवघे तन,  मन, चिंब होऊन जाते, अंगणातलाच नव्हे; तर मनातला मोर ही नाचू लागतो. पावसात भिजायला जायचे बेत ठरू लागतात. नवनवीन ठिकाण शोधायला मन आतूर होते. घर-संसार, रोजचे तेच काम कंटाळवाणे वाटता-वाटता हळूच निसर्गाच्या कुशीत शिरून मन प्रसन्न आणि शक्तीमान केले की, पुढच्या दिवसांसाठी एक आंतरिक ऊर्जा निर्माण होते.

पुण्यापासून जवळच असलेल्या ठिकाणी एक दिवस



तुम्ही जाऊन आलात, तर पुढचा आठवडा मनावरील ताण कमी करण्याबरोबरच मनशांतीचा आनंद मिळवून देतो. घोरावडेश्वर हे त्यातले एक महत्त्वाचे ठिकाण. देहूरोडच्या पुढे बेगडेवाडी रेल्वे स्थानकाच्याजवळ शंकरवाडी थांब्याजवळच्या डोंगरावर हे घोरावडेश्वर मंदिर आहे.
महाशिवरात्रीला व श्रावणी सोमवारी हजारो भक्त लोक श्रद्धेने या मंदिरात येतात. पावसाळ्यात हिरवेगार नटलेले डोंगर वेगवेगळ्या प्रकारची मनमोहक फुले, पक्षी, सुखद गारवा ११ लेण्यांचा समूह व त्यांच्या आसपास २८ पाण्याची टाकी, चैत्यगृह व खोल्या असे तिसऱ्या शतकातील खोदकाम केलेले हे ठिकाण आहे.

अमरजाई मंदिर, गणपती मंदिर आणि आजूबाजूला गर्द झाडीतील बाग व मुलांसाठी खेळणी हे या  ठिकाणीचे मुख्य आकर्षक आहे. शिरगावचे प्रतीशिर्डी संबोधले जाणारे 'श्री साईबाबांचे' मंदिर येथूनच जवळच आहे.

भंडारा डोंगर हे आणखी एक पुण्याजवळील ठिकाण. संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने पवित्र  असा हा डोंगर व त्याच्या आजूबाजूचा जाधववाडी धरणाचा परिसर, इंदूरीचा भुईकोट किल्ला,  चाकणचा भुईकोट किल्ला अशी एक दिवसाची मस्त सहल होऊ शकते.

पुण्यापासून नाशिक रोडने चाकणहून तळेगावकडे येणाऱ्या रस्त्यावर सहा ते सात कि.मी. अंतरावर उजव्या बाजूला भंडारा डोंगर आहे. तेथे असलेली स्वागत कमान आपले लक्ष लगेच वेधून घेते. डोंगराच्या एका बाजूला थोड्या अंतरावर काही बौद्ध लेणी आहेत. ध्यानासाठी ही अत्यंत योग्य अशी जागा आहे. पुण्यापासून भंडारा डोंगर अंतर साधारणतः ४० कि. मी. आहे.

नेहमीच्या वर्दळीपासून अगदी दूर असलेली बेडसे लेणी ही बौद्धकालीन लेणी. पुणे-लोणावळा मार्गावर कामशेत स्टेशनपासून १०-१२ कि. मी. अंतरावर आहे. कामशेतहून पवनानगरच्या रस्त्यावर बेडसे लेण्याकडे जाता येते. भर पावसाळ्यात लेण्यांच्या बाजूने फार मोठा सुंदर धबधबा कोसळत असतो. लेण्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची भरपूर कुंड आहेत. मावळ खोऱ्याचे दर्शन, तिकोना किल्ल्याची शिखरे व विस्तीर्ण हिरवेगार बेडसे गाव पाहताना नजर खिळून



राहते. गावात काही घरांमध्ये खास घरगुती जेवण मिळते. पुणे ते बेडसे अंतर साधारणतः ६० कि. मी. आहे.

भाजे लेणी पुण्यापासून साधारणतः ५५ कि. मी. अंतरावर आहे. पुणे लोणावळा रस्त्याने मळवली स्टेशनजवळ भाजे गावच्या समोरच्या डोंगरात ही भाजे लेणी आहेत. पायऱ्याची सोय असल्याने वरपर्यंत सहजपणे चढता येते. चैत्यगृह व विशाल स्तूप, त्यावरील कोरीव कलाकुसर, पिण्याच्या पाण्याची कुंडे, धबधबे, आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर, मोकळी खेळती हवा, जेवणाची उत्तम  व्यवस्था या ठिकाणी होत असल्यामुळे एक दिवसाच्या सहलीला हे ठिकाण अत्यंत उपयुक्त आहे.

कोल्हापूरपासून १८ ते २० कि. मी. अंतरावर पन्हाळा हा किल्ला आहे. श्रीक्षेत्र ज्योतिबा डोंगर, वारणा खोरे, विशाळगड, कोकणमार्ग व संपूर्ण गडाभोवती प्रदक्षिणा असा हा परिसर पर्यटनासाठी अत्यंत योग्य आहे. अनेक प्राणी, पक्षी, गर्द झाडी, ऐतिहासिक बाबी या सहलीत पाहावयास मिळतात. गडावर अनेक गुहा असून तेथे पूर्वी ध्यान धारणा करत असत.

बोरीवलीपासून काही अंतरावर गोराई गाव येथे एसेलवर्ल्ड मोठ्या दिमाखात उभे आहे. सर्व प्रकारची खेळणी, खाद्यपदार्थांची रेलचेल, म्युझिक, स्वीमिंग, डान्स, कारंज्यांचे फवारे, सगळीकडे मज्जाच मज्जा. बोटिंगची खास व्यवस्था मन प्रसन्न करून टाकते. याच्या शेजारीच जगाला शांतीचा संदेश देणारा 'विपश्यना शांती स्तूप' आहे. ३२५ फूट उंचीचा खांबाविरहित, एकाच वेळी आठ हजार साधक बसून शकतील, असा हा स्तूप सर्वांचे लक्ष वेधून घेतो. १०० कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या ग्लोबल पॅगोडामध्ये 'बुद्धजीवन चित्रावली हॉल' पाहिल्यानंतर बुद्धांच्या संपूर्ण जीवनाचे आकलन होऊन प्रगाड शांतीचा अनुभव मिळतो. जगातून अनेक पर्यटक हा स्तूप पाहण्यासाठी येतात. या घुमटाच्या वरील भागात महाबोधी सोसायटी व श्रीलंका सरकारने दान दिलेल्या बुद्धांच्या पावन अस्थिधातू स्थापित केल्या असल्यामुळे याला अध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

हजारोंच्या संख्येने पर्यटक याकडे आकर्षित होतात. एक दिवसाची ही सहल आपल्याला पूर्ण ताजेतवाने करते.

बऱ्याच प्रेक्षणीय स्थळांना आपण भेटी दिल्या असणार. बाहेरच्या जगात बऱ्याचदा आपण शांती अनुभवली असेल, रिचार्ज झाले असाल; परंतु शांती ही अंतर्जगात आहे. 'पिंडी ते ब्रह्मांडी' या साडेतीन हात लांब असलेल्या शरीरातील मनात सर्व जग ब्रह्मांड सामावलेले आहे. भारत हा संतांचा देश, मुक्तीचा देश, बुद्धांचा देश. अंतर्शांती मिळविण्यासाठी आपले शरीर सबल व निरोगी, मन निर्मल करून शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी पुण्यात स्वारगेट (नेहरू स्टेडियमससमोर) येथे विपश्यना ध्यान केंद्र ११ वर्षांपासून तसेच आळंदीजवळ मरकळ या गावी १५ वर्षांपासून कार्यरत आहे. या परिसरात ध्यानाचे १० दिवसाचे निवासी वर्ग मोफत चालतात. राज्य सरकारने या अंतर्मनांच्या सहलीसाठी १४ दिवसांची सुटी देणे मान्य केलेले आहे. एकदा का होईना अंतर्शांतीची ही सहल जरुर करा व मनातून एकच धनु येऊ द्या, 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे!'